
समाजकार्य :
जीवनगौरव पुरस्कार

मनोगत ।
नागनाथअण्णा नायकवडी

# असंख्य कार्यकर्त्यांचे शिकस्तीचे प्रयत्न चालू आहेत



१९४२ च्या चळवळीत क्रांतिसिंह नाना पाटील यांच्यासोबत प्रतिसरकारच्या स्थापनेत पुढाकार. स्वातंत्र्यानंतर सामाजिक, राजकीय, विधायक कामाला वाहून घेतले.
नागनाथअण्णांनी उभा केलेला हुतात्मा अहिर साखर कारखाना संपूर्ण महाराष्ट्रात आगळावेगळा म्हणून ओळखला जातो.
शेतकऱ्यांना सर्वाधिक दर या कारखान्यामार्फत दिला जातो.
सामाजिक, शैक्षणिक, साहित्यिक, असंख्य परिवर्तनवादी कार्यक्रम नागनाथअण्णांच्या प्रेरणेने राबवले जातात.
सांगली व सातारा जिल्ह्यांतील दुष्काळी भागांना पाणी मिळावे यासाठी गेली १५ वर्षे नागनाथअण्णांच्या नेतृत्वाखाली तीव्र संघर्ष चालू आहे आणि तो यशस्वी होतो आहे.
सामाजिक न्यायासाठी सातत्याने संघर्ष हा अण्णांचा स्थायीभाव आहे.

भगतसिंग, बाबू गेनू, किसन अहिर, नानकसिंग यां सारख्या हजारो क्रांतिकारकांनी प्राणाची पर्वा न करता हौतात्म्य पत्करले. लाखो देशभक्तांनी कठोर तुरुंगवास भोगला, लाठीमार सहन केला. वेगवेगळ्या मार्गांनी हा इंग्रज सत्ता विरोधाचा स्वातंत्र्य लढा जवळ जवळ १८५७ पूर्वीपासून १९४७ पर्यंत लढवला. १९२० नंतर महात्मा गांधी यांच्या नेतृत्वाखाली सर्वसामान्य शेतकरी, कामगार, विद्यार्थी या स्वातंत्र्य लढ्यात उतरले. शेवटी इंग्रज राज्यकर्त्यांना कळून आले की, सर्वसामान्य जनता प्रत्यक्ष-अप्रत्यक्षरीत्या या स्वातंत्र्य लढ्यात सहभागी झाली आहे, आता भारतावर राज्य करणे अशक्य आहे. म्हणून वाटाघाटी करून त्यांना भारताला स्वातंत्र्य बहाल करणे भाग पडले. समाधान एकच की, मी व माझ्यासारख्या असंख्य कार्यकर्त्यांनी कर्तव्य भावनेने या स्वातंत्र्य लढ्यात उडी घेतली व स्वातंत्र्य मिळेपर्यंत इंग्रज सत्तेच्या विरोधात लढत राहिलो.

१५ जुलै १९२२ ला वाळवे. येथील शेतकरी कुटुंबात माझा जन्म झाला. वडील रामचंद्र नायकवडी यांना वाटे की, मुलाने तालमीत जावे, पैलवान व्हावे. आई लक्ष्मीबाईंना वाटे की, मुलाने खूप शाळा शिकावी. १९३० चा तो काळ. मी प्राथमिक शाळेत शिकत होतो. या काळात क्रांतिसिंह नाना पाटील यांनी महात्मा गांधीजींच्या विचाराने प्रभावित होऊन तलाठ्याच्या नोकरीचा त्याग करून स्वातंत्र्याचा संदेश देण्यासाठी गावोगाव सभा घेऊन लोक जागृती करण्यास सुरुवात केली होती. महात्मा फुलेंच्या सत्यशोधकी विचारांचाही त्यांच्यावर प्रभाव होता. माळ भागावरील घराजवळ असणाऱ्या मारुती मंदिराच्या समोर पार कट्ट्यावर संध्याकाळी नाना पाटलांची सभा होत असे. सभेअगोदर संपूर्ण गावातून फेरी काढली जाई, त्यात सर्वांत अग्रभागी राहून तिरंगा झेंडा हातात घेण्यास मला अभिमान वाटे.

नाना पाटलांचे रसाळ, ग्रामीण बोली भाषेतील, जीवनातील दाखले देणारे गावरान भाषण ऐकत असे. यातूनच माझे स्वातंत्र्य लढ्याचे आकर्षण वाढले. याच काळात गावा शेजारी येडेनिपाणीचे क्रांतिवीर पांडू पाटील हे शाळेत शिक्षक लाभले. त्यामुळे देशभक्तीचे बाळकडूच मिळाले. भारत मातेच्या स्वातंत्र्यासाठी काहीतरी केले पाहिजे असे वाटे पण नेमका मार्ग सापडत नव्हता. पुढे काही काळ आष्टा येथे शिक्षणासाठी थांबलो. नंतर कोल्हापूरला प्रिन्स शिवाजी मराठा बोर्डिंगमध्ये राहू लागलो. याच काळात राष्ट्रसेवादलात सामील झालो, विद्यार्थी चळवळीत भाग घेऊ लागलो. खेळामध्ये व अभ्यासात प्रावीण्य संपादन केले. सेवाभावी वृत्तीने इतरांच्या मदतीसाठी धाव घेत असे; यातूनच समाजाविषयीची, देशाविषयीची कर्तव्य भावना वाढीस लागली. १९३९ मध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांची भेट झाली. त्यांची शिक्षणाविषयीची तळमळ पाहून १९३९ ते १९४१ या काळात शिराळा पेठ्यात अतिदुर्गम भागात मित्रासोबत व्हॉलंटरी शाळांची सुरुवात केली. कामेरी ता. वाळवा येथे विद्यार्थी परिषद आयोजित करण्यासाठी पुढाकार घेतला.

कोल्हापुरात त्या काळात स्वातंत्र्य चळवळीचा भाग म्हणून विद्यार्थी चळवळ जोमाने वाढत होती. 'हरिजन' या महात्मा गांधी यांच्या नियतकालिकाचे मी नियमित वाचन करत असे. महात्मा गांधीजींच्या राष्ट्रवादी विचारांचा आणि त्यासाठी खादी वापरण्याच्या विचाराचा माझ्यावर प्रभाव पडला. इस्लामपूर येथे खादी भांडाराची सुरवात केली. 'हरिजन' या नियतकालिकामधून ७ आणि ८ व ९ ऑगस्ट १९४२ च्या मुंबई येथील गवालिया टँक (आजचे ऑगस्ट क्रांती मैदान) वर होणाऱ्या अखिल भारतीय काँग्रेस अधिवेशनाची माहिती मिळाली, मी माझ्या कांही मित्रासह मुंबईकडे धाव घेतली. मी स्वयंसेवकाच्या वेषात असल्याने अधिवेशनात प्रवेश मिळवता आला. या अधिवेशनात महात्मा गांधी यांनी संपूर्ण स्वातंत्र्याचा ठराव मांडताना इंग्रज राज्यकर्त्यांना 'चले जाव!' असे ठणकावले व कार्यकर्त्यांना स्वातंत्र्यासाठी 'करा किंवा मरा' असा अखेरचा संदेश दिला. पंडित जवाहरलाल नेहरूंचे भावनाप्रधान व जोशपूर्ण भाषण झाले. मी भारावून गेलो. शिक्षण सोडून पूर्णपणे स्वातंत्र्य चळवळीत स्वत:ला झोकून द्यायचे अशा निर्धाराने परतलो. राष्ट्रीय नेत्यांना अटक झाली होती. अनेक कार्यकर्ते भूमिगत झाले होते. स्वातंत्र्य लढ्याचा हा काळ तीव्र बनला होता. सातारा (आजचा सांगली-सातारा) जिल्हा आघाडीवर होता. संपूर्ण देशात अनेक ठिकाणी इंग्रज सत्तेच्या कायद्याला न जुमानता हरताळ पाळला गेला. निदर्शने झाली. चळवळीचे लोण ग्रामीण भागातही पसरले. अनेक ठिकाणी प्रचंड जमावाने, इंग्रज सत्तेबद्दलचा असंतोष व चीड व्यक्त करण्यासाठी पोलिसठाणी, पोस्ट कार्यालये, न्यायालये, रेल्वे स्थानके यांवर हल्ले चढवले, रेल्वे रूळ उखडले, टेलिफोन व्यवस्था उद्ध्वस्त केली. शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थीही यात सहभागी होते : मामलेदार कचेरीवर मोर्चे काढले गेले, काही ठिकाणी इंग्रज पोलिसांनी मोर्चे काढणाऱ्यांवर निर्दयपणे गोळीबार केला. अनेकांना हौतात्म्य आले, कित्येकांना तुरुंगात डांबले गेले. नि:शस्त्र मोर्चेकरांच्यावर होणारा गोळीबार पाहून मी अस्वस्थ झालो. इंग्रज पोलिसांच्या गोळीबारास गोळीनेच उत्तर द्यावे लागेल असे वाटू लागले. नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेसारखे सशस्त्र दल उभे करण्याचा निश्चय केला. अनेक अडचणींवर मात करून शस्त्रे जमवण्यास सुरुवात केली. गोव्यात पोर्तुगांची सत्ता असल्याने तेथे हत्यारे मिळतील असे समजल्याने नोव्हेंबर १९४२ मध्ये मी गोव्यास गेलो. १५ डिसेंबर १९४२ रोजी हत्यारे घेऊन परत आलो. सशस्त्र

चळवळीसाठी पैशाची गरज होती. सरकारी पैसाच त्यासाठी मिळवायचा या हेतूने ७ जून १९४३ ला शेणोली (ता. कराड) येथे, सहकाऱ्याच्या मदतीने स्पेशल पे-ट्रेन लुटली १९७१६ रुपये मिळाले. चळवळीला जोम आला.

इंग्रज सरकारचा कायदा मानायचा नाही. स्वतःचे स्वतंत्र सरकार निर्माण करावयाचे या विचाराने 'समांतर सरकार-(प्रतिसरकार)' निर्माण करायचे ही कल्पना पुढे आली होती. ऑगस्ट १९४२ मध्ये उत्तर प्रदेशात 'बालिया', बंगालमध्ये 'मिदनापूर' येथे असे प्रयत्न झाले पण ३ ऑगस्ट १९४२ ला पणुंब्रे (ता. शिराळा) येथे क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली प्रतिसरकारची स्थापना झाली. हे प्रतिसरकार स्वातंत्र्य मिळेपर्यंत टिकले. सातारा जिल्ह्याच्या उत्तर दिशेस वाहणाऱ्या नीरा नदीपासून जिल्ह्याच्या दक्षिण बाजूस वाहणाऱ्या वारणा नदीपर्यंतचा प्रदेश प्रतिसरकारच्या नियंत्रणाखाली होता. त्यासाठी १८ गट निर्माण केले होते. प्रत्येक गटात एक गटप्रमुख व एक उपगटप्रमुख असे. वाळवे गटप्रमुख म्हणून माझ्यावर जबाबदारी आली. उपगटप्रमुख म्हणून पै. किसन अहिर हे होते. १० ऑक्टोबर १९४३ ला सांगाव (जि. कोल्हापूर) येथील पोलीस चौकीतून मी व माझ्या सहकाऱ्यांनी तीन बंदुका लुटल्या. १४ एप्रिल १९४४ ला स्वातंत्र्य लढ्यात देशभर गाजलेल्या धुळे खजिना लुटीच्या चित्तथरारक व शौर्य गाजवणाऱ्या लुटीतून ५ लाख रुपये मिळाले. मिळालेली सर्व रक्कम वेगवेगळ्या भागांतील कार्यकर्त्यांच्यामध्ये वाटली. ज्याचा पुढील स्वातंत्र्य चळवळीस फार उपयोग झाला. २९ जुलै १९४४ रोजी देशद्रोही खबऱ्यांनी फितुरी केल्याने वाळवे येथे इंग्रज पोलिसांनी छापा टाकून मला अटक केली. तुरुंगात गेल्यानंतर पहिल्या दिवशीच तुरुंग फोडून बाहेर पडण्याचा मी निश्चय केला होता. तुरुंगात असतानाच मला समजले की, देशद्रोही फितुरांचा एक हात व एक पाय तोडण्याची शिक्षा माझ्या सहकाऱ्यांनी दिली होती. इस्लामपूरहून सातारा जेलमध्ये माझी रवानगी करण्यात आली व सहकाऱ्यांच्या मदतीने १० सप्टेंबर १९४४ रोजी सकाळी ८ वाजता सातारा तुरुंगातून तटावरून उडी मारुन मी स्वतःची सुटका करून घेतली व पुन्हा भूमिगत होऊन स्वातंत्र्य चळवळीत काम करू लागलो.

सशस्त्र क्रांतीच्या दिशेने माझी पावले पडली. भगतसिंग, सुभाषचंद्र बोस यांच्या क्रांतिकारी कार्याचा माझ्या मनावर प्रभाव होता. प्रतिसरकारची गरज म्हणून सुभाषचंद्र बोस यांच्या आझाद हिंद सेनेच्या धरतीवर सशस्त्र सैनिकी दल उभे केले. यातील तरुणांना सैनिकी शिक्षण मिळावे म्हणून ८८ दर्यागंज-दिल्ली येथे जाऊन आझाद हिंद फौजेतील सैनिक नानकसिंग व मन्सासिंग यांना वाळव्यास आणले व शिराळा पेठ्यात फौजी कँप चालू केला. यासाठी सर्वसामान्य माणसांचीही आम्हांला मदत झाली. २५ फेब्रुवारी १९४६ ला इंग्रज पोलिसांशी सोनवडे (ता. शिराळा) येथे सशस्त्र लढ्यात माझे दोन सहकारी किसन अहिर व नानकसिंग हुतात्मा झाले. माझे दोन सहकारी धारातीर्थी पडताना पाहून खूप दुःख झाले. त्यांच्या त्यागाचे स्मरण मी आयुष्यभर जोपासत आलो.

प्रतिसरकार चालवत असताना आमच्या समोर महात्मा गांधीजींच्या ग्रामराज्याची कल्पना होती. गावागावांत गट तट असू नयेत, गावात शांतता नांदावी, राष्ट्रप्रेमी तरुणांनी व गरीब सत्प्रवृत्तीच्या लोकांनी संघटित व्हावे, विधायक कार्य करावे, व्यसनमुक्त, समताधिष्ठित, सुशिक्षित व सुदृढ समाज निर्माण व्हावा, अन्याय अत्याचाराचा बीमोड व्हावा; यासाठी साक्षरता प्रसार, अस्पृश्यता निवारण, अंधश्रद्धा निर्मूलन, व्यसन मुक्ती, ग्राम स्वच्छता, स्त्री पुरुष समानता, हुंडा बंदी, गांधी विवाह पद्धती इत्यादी कार्यक्रम राबवले जात होते. अन्यायग्रस्त, गोरगरीब व स्त्रियांना न्याय मिळवून देण्याचे काम प्रतिसरकारचे कार्यकर्ते करत होते. जवळ जवळ २ हजार खटले चालवले गेले व जनतेला न्याय मिळवून दिला.

हे प्रतिसरकार चालवत असताना काही दुष्ट प्रवृत्तीचे लोक भूमिगतांचे विधायक कार्य उधळून लावण्याचा प्रयत्न करत होते. 'प्रतिसरकार'ची 'पत्री सरकार' असा मुद्दाम नामोल्लेख करत काही दरोडेखोर महात्मा गांधी व नाना पाटील यांचा जयजयकार करून दरोडे टाकत व लूटमार करून चळवळ बदनाम करू पाहत होते. त्यांच्यावर कार्यकर्त्यांनी वेळीच जरब

**क्रांतीसिंह नाना पाटील यांना उतार आयुष्यात आम्ही कार्यकर्त्यांनी वाळवा येथे आणले, किसान शिक्षण संस्थेच्या आवारातच त्यांचे निवासस्थान होते. मी आणि माझी आई, कुटुंबीय, माझे कार्यकर्ते यांनी त्यांची मनोभावे सेवा केली. 'माझा राजकीय वारसदार म्हणजे नागनाथ' असे सांगून त्यांनी मला मानसपुत्राचा सन्मान दिला. ६ डिसेंबर १९७६ ला त्यांचा वृद्धत्वाने अंत झाला. शेतमजूर, कष्टकरी शेतकरी, कामगार, सर्वसामान्य जनतेविषयीचे त्यांचे कार्य पुढे चालवणे आजही आवश्यक आहे.**

बसवली. काही जमीनदार-वतनदार प्रतिसरकारची चळवळ मोडून काढण्यासाठी भूमिगतांच्या विषयीच्या बातम्या इंग्रज अधिकाऱ्यांना पुरवत. त्यानाही जरब बसविणे भाग पडले. खरे तर सामान्य जनतेच्या पाठिंब्यावर, सामान्य जनतेच्या कल्याणासाठी इंग्रज सत्ता नष्ट करून स्वराज्याचा पाया मजबूत करणे हेच प्रतिसरकारचे कार्य होते.

१९४६ ला कर्मवीर भाऊराव अण्णांच्या अपेक्षेप्रमाणे ऐतवडे बु।। येथे सामुदायिक शेतीचा प्रयोग राबवण्यात पुढाकार घेतला. विद्यार्थी परिषदेच्या माध्यमातून रयत शिक्षण संस्थेला १ लाख रुपयांचा निधी गोळा करण्यात पुढाकार घेतला. महार वतने नष्ट करून जमिनी त्यांच्या मालकीच्या व्हाव्यात यासाठी वतन मुक्ती लढा संघटित केला. हैद्राबाद मुक्ती संग्राम व गोवा मुक्ती आंदोलनात कार्यकर्त्यांच्या सोबत शक्य ते कार्य केले.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर आपला भ्रमनिरास झाल्याने अनेक क्रांतिकारक स्वातंत्र्य सैनिकांच्या लक्षात आले. स्वातंत्र्य लढ्यात कोठेच नसणारे किंबहुना इंग्रजांचे हस्तक असणारे अनेकजण बाजू बदलून राजकीय सत्ताधाऱ्यांच्या जवळ सरकले. लोकशाही शासन व्यवस्था आली पण शेतकरी, शेतमजूर, कामगार, मध्यमवर्गीय कारकून, दलित, आदिवासी इत्यादी समाज घटकांना खऱ्या खुऱ्या स्वातंत्र्याचा प्रत्यय येईनासा झाला. 'माझा शेतकरी राजा सुखी झाला पाहिजे;' असे क्रांतिसिंह म्हणत पण स्वातंत्र्योत्तर काळात शेती व्यवसाय धोक्यातच आला. दिवसेंदिवस महागाई, बेकारी, अनाआरोग्य, व्यसनाधीनता, भ्रष्टाचार, वाढतच राहिला. म्हणून आम्ही कार्यत्यांनी जनतेची बाजू घेऊन चळवळीच्या माध्यमातून सरकारवर दबाव आणून जनतेला न्याय मिळवून देण्याचे काम स्वीकारले, मुंबई संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यात काम केले. १९४९ ला वाळवे गावात 'किसान शिक्षण संस्था' स्थापन केली. आज या संस्थेच्या माध्यमातून बालवाडीपासून महाविद्यालयापर्यंत. विविध शाखांतून दलित, आदिवासी, धरणग्रस्त, शेतकरी, शेजमजूर व कामगार यांची मुले मुली वसतिगृही शिक्षणाचा लाभ घेत आहेत.

क्रांतीसिंह नाना पाटील यांना उतार आयुष्यात आम्ही कार्यकर्त्यांनी वाळवा येथे आणले, किसान शिक्षण संस्थेच्या आवारातच त्यांचे निवासस्थान होते. मी आणि माझी आई, कुटुंबीय, माझे कार्यकर्ते यांनी त्यांची मनोभावे सेवा केली. 'माझा राजकीय वारसदार म्हणजे नागनाथ' असे सांगून त्यांनी मला मानसपुत्राचा सन्मान दिला. ६ डिसेंबर १९७६ ला त्यांचा वृद्धत्वाने अंत झाला. शेतमजूर, कष्टकरी शेतकरी, कामगार, सर्वसामान्य जनतेविषयीचे त्यांचे कार्य पुढे चालवणे आजही आवश्यक आहे.

रस्त्यासाठी साराबंद चळवळ, सहकारी पाणी पुरवठा लिफ्ट इरिगेशन, कृष्णा नदीवर कोल्हापुरी पद्धतीचा बांधारा, फासेपारधी व भटक्यांचे पुनर्वसन इत्यादी विधायक कामे करत असतानाच चळवळीच्या पार्श्वभूमीवर २६मार्च १९८१ रोजी हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याला केंद्र सरकारची मान्यता मिळवली. १५ गावांचे कार्यक्षेत्र असणाऱ्या परिसरात समाजातील शेतमजूर, शेतकरी, दलित इत्यांदी सर्व घटकांना भेदभाव न करता ८ हजार शेअर्सची विक्री झाली. १९८३ ला साखर कारखाना उभारणीस सुरुवात झाली. ११ महिन्यांत कारखान्याची उभारणी पूर्ण करून ९ कोटी मंजुरीचा हा प्रकल्प ८ कोटी ५० लाखांत पूर्ण केला. २०-१-१९८४ ला पहिला गळित हंगाम सुरू झाला.

हुतात्मा किसन अहिर सहकारी साखर कारखान्याच्या माध्यमातून जाणीवपूर्वक केलेले विविध प्रयोग यशस्वी झाले. गाववार सभा घेऊन शेअर्स विक्री, नोकर भरती, लागणतारीख व उसाची रिकव्हरी पाहून ऊस तोड, तोडणी कामगारांना विविध प्रकारच्या सोयी सवलती, शेतकऱ्याला जास्तीत जास्त ऊस दर देण्याची प्रथा, साखर कामगार पहिल्या दिवसापासून कायमस्वरूपी व त्यांना प्रत्येक महिन्याच्या एक तारखेस पगार, जास्तीत जास्त ४० टक्के पर्यंत बोनस, साखर कारखान्यातून मिळणाऱ्या नफ्यातून शेतकरी, कामगार, शिक्षण संस्था, सामाजिक चळवळी असे चार वाटे करून तसा खर्च केला.

भूकंपग्रस्त, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्त, दलित-आदिवासी यांच्या चळवळींना कारखान्याच्या माध्यमातून मदत झाली. वाळवा येथे दोन वेळा दलित-आदिवासी, ग्रामीण साहित्य संमेलन घेऊन साहित्य चळवळीला मदत केली. शेतकरी व कार्यकर्ते यांचे प्रबोधन करण्यासाठी अभ्यास शिबिरे घेतली. जातीयवादी धर्मांध शक्तींचा बीमोड करण्यासाठी राष्ट्रीय एकात्मतेची चळवळ राबवून सांगली-सातारा-कोल्हापूर जिल्ह्यातील शेतमजूर, कष्टकरी शेतकरी, कामगार यांच्या वतीने परिषदा घेतल्या. वाळवा ते हुतात्मा नगर (सोनवडे) अशी ८० किलोमीटरची मानवी साखळी उभा केली. क्रांतिकारी विद्यार्थी संघटना, स्त्रियांच्या परिषदा यांची उभारणी झाली. महाराष्ट्र राज्यातील शेतकरी, साखर कामगार, धरणग्रस्त, दुष्काळग्रस्तांचे प्रश्न सोडवण्याचे मी व माझ्यासोबत असंख्य कार्यकर्त्यांचे शिकस्तीचे प्रयत्न चालू आहेत.

**नागनाथअण्णा नायकवडी**
वाळवा, जि. सांगली.
Ph. 02342-267538.

ओळख । **बाबुराव गुरव**

# कृतीतून तत्त्वज्ञान उभे करणारा

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा जगातील क्रांतिकारकांच्या इतिहासात एक नंबरचा इतिहास आहे. क्रांतिकारक आणि हुतात्मे यांच्या स्वभाव वैशिष्ट्यांच्या अंगाने अभ्यास, संकलन आणि मांडणी मराठीत आजवर फारशी झालेली नाही. भारतीय चित्रपटसृष्टीचा थोडाफार अपवाद वगळला तर क्रांतिकारकांचे स्वभाव, कृती, विचार, शैली, रूप, आवाज, व्यक्तिमत्त्व या बाबी इतिहासाच्या पडद्याआडचे गूढच राहिले आहे.

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचे सोनेरी पान म्हणजे 'साताराचे प्रतिसरकार'. या पर्वाचाही खराखुरा इतिहास पूर्णपणे समोर आलेला नाही. केवळ चव्वेचाळीस महिने चाललेल्या या चळवळीने जगभर खळबळ माजविली होती. ब्रिटिशांच्या साम्राज्यशाहीचे बळी ठरलेल्या जगातल्या सर्व लहानमोठ्या देशांतील क्रांतिकारकांना या चळवळीने प्रेरणा दिली. या चळवळीचे निर्विवाद नेते क्रांतिसिंह नाना पाटील यांनी क्रांतिवीरांचे मोहोळ निर्माण केले. डॉ. उत्तमराव पाटील यांनी आपल्या ग्रंथात म्हटले आहे की, "श्रीकृष्णाने आपल्या करंगळीवर गोवर्धन पर्वत पेलला असे पुराणकथा सांगते. कांतिसिंहांनी साताऱ्यात उभे केलेले प्रतिसरकार मात्र क्रांतिअग्रणी जी.डी. बापू लाड आणि क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी या दोन प्रमुख खांबांवर उभे होते. हा वास्तव इतिहास आहे.

क्रांतिवीर नागनाथअण्णा नायकवडी हे स्वातंत्र्यसैनिकांना दिले जाणारे निवृत्तिवेतन न घेणारे स्वातंत्र्यसेनानी आहेत. साताराची 'आझाद हिंद फौज' या फौजेचे ते संघटक नेते आहेत. कुंडल बँक लूट, सुर्ली घाट पोस्टमन लूट, शेणोलीचे स्पेशल लूट, धुळे साडेपाच लाखांचा खजिना लूट, सातारा जेल फोडून बाहेर पडलेले क्रांतिवीर, सोनवडे येथे समोरासमोर गोळीबार करून पोलिसांना पळवून लावणारे लढवय्ये, हु. किसन अहिर, हु. नानकसिंग, हु. बाबुराव कोकाटे, हु. प्रताप पाटील अशा हुतात्म्यांचे सहकारी नेते आहेत. भारतीय स्वातंत्र्य चळवळीतील नागनाथअण्णांचे शौर्य, त्याग, समर्पण, कष्ट यांचे या पेक्षाही अधिक तपशिलाने खोलात जाऊन दर्शन घेता येईल. साताराच्या चळवळीत पहिले हत्यार गोव्यातून आणणारे शस्त्रसंकलक अशीही त्यांची ओळख आहे. मृत्यूचे कफन डोकीला बांधून जिवाची पर्वा न करता चळवळीत लढणारा भगतसिंग, बाबू गेनू, सुभाषबाबू यांच्या पावलावर पावले टाकणारा, आश्चर्यकारकपणे जिवंत राहिलेला आणि स्वतंत्र भारतात हुतात्म्यांची जिवंत स्मारके उभारणारा 'जिवंत हुतात्मा' अशा शब्दांत जबाबदार अभ्यासकांनी त्यांचे वर्णन केलेले आहे.

क्रांतिवीर नागनाथअण्णांची स्वातंत्र्यसेनानी म्हणून असलेली ओळख बरोबरच आहे. ही ओळख अतिशय महत्त्वाचीही आहे, पण क्रांतिवीर अण्णांची एवढीच ओळख पुरेशी नाही. स्वातंत्र्य चळवळीत अशाच प्रकारचा त्याग करणारी आणखी चारदोन नावे सांगता येतील. बहुतेक सगळे स्वातंत्र्यसैनिक चळवळीतल्या ऐतिहासिक त्यागाच्या कैफातच स्वतंत्र भारतातले आपले अनमोल जीवन जगत राहिल्याचा क्लेशदायक अनुभव आपण सर्वांनी घेतला आहे. नागनाथअण्णांनी राजकीय स्वातंत्र्य जाहीर होताच खऱ्याखुऱ्या सर्वंकष स्वातंत्र्यासाठीचे दुसरे स्वातंत्र्ययुद्ध अपुऱ्या सामग्रीनिशी सुरू केले आणि या घडीपर्यंत निष्ठेने लढविले. शेवटच्या श्वासापर्यंत ते लढवणार असल्याच्या आश्वासक हालचाली आजही चालू ठेवल्या आहेत. नागनाथअण्णांच्या आयुष्यभराच्या अस्वस्थ, अथक प्रयोगक्षम चळवळींतून खऱ्याखुऱ्या स्वातंत्र्याचे स्वप्न आता धरणग्रस्त, साखर कामगार, छोटे कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, दलित, आदिवासी, असंघटित कामगार, स्त्रिया यांच्या डोळ्यांत तरळू लागले आहे. मला वाटते अण्णांचे नेमके वेगळेपण त्यांच्या या प्रतिभासंपन्न क्रांतिकारी लढ्यात आहे.

स्वातंत्र्याच्या पूर्वसंध्येला अण्णांनी चळवळीतल्या अनेकांचे अनेक रंग पाहिले. सत्तातुरांचे संधिसाधूपण त्यांच्या तरुण क्रांतिकारी मनाला खोल जखम करून गेले. न तपासताच उघडे पडलेले काहींचे उथळ तळ अण्णांना व्यथित करून गेले. देशभर असंख्य हालचाली, उलथापालथी वेगाने घडत होत्या. नवनवे पक्ष तयार होत होते. बोलभांड (पोजी) नकली भूमिका घेणाऱ्या पुढाऱ्यांची चलती होती. महाराष्ट्रात छोटे छोटे चिंचोळे पक्ष तयार करण्यात कळप करून राहिलेले नेते रस घेत होते. डोकीवरून पदर का खांद्यावरून पदर या मतभेदांना महत्त्व आले होते. यशवंतरावजी चव्हाण, बाळासाहेब देसाई, वसंतदादा पाटील यांचे आणि नागनाथअण्णांचे व्यक्तिगत संबंध प्रेमाचे होते. तिघांनीही आपापल्या परीने अण्णांना काँग्रेसमध्ये नेण्याचा आटोकाट प्रयत्न केला. पण तसे घडले नाही. एस.एम. अण्णांनी तार करून समाजवादी पक्षात दाखल होण्याचे निमंत्रण दिले. अण्णा शांतच राहिले. २६ फेब्रुवारी १९४७, हुतात्मा किसन अहिर आणि हु. नानकसिंग यांचा पहिला स्मृतिदिन. क्रांतिसिंह नाना पाटील अध्यक्ष होते. साने गुरुजी प्रमुख पाहुणे होते. कॉ. दत्ता देशमुख प्रमुख उपस्थित होते. हजारो नागरिक साश्रू नयनाने सभा ऐकत होते. नागनाथअण्णा म्हणाले, ''मी बालपणीच अण्णांच्या (नाना पाटील) चळवळीत सहभागी झालो आहे. मी माझे जीवन क्रांतिसिंहांच्या शब्दाला वाहिले आहे. सोनवाड्यात (हुतात्मा नगर) गोळीने दिशा थोडी बदलली असती तरी मी हुतात्मा झालो असतो. पण माझा त्याग कमी पडला असावा. उरलेल्या आयुष्यात मी तो त्याग करणार आहे. मी जिवंत हुतात्म्याचे जीवन जगणार आहे. हुतात्म्यांची अपुरी स्वप्ने पुरी करण्यासाठी झगडणार आहे. कॉ. दत्ता देशमुखांनी मला साथ करावी. अण्णा आणि गुरुजींनी आशीर्वाद द्यावेत. मार्गदर्शन करावे.''

नागनाथअण्णा हे अव्वल दर्जाचे क्रांतिकारी राजकारणी आहेत. शिक्षण, शेती, क्रीडा, कामगार आणि सहकार क्षेत्रातले रचनात्मक कार्यकर्ते आहेत. शोषणमुक्ती, सामाजिक समता आणि उत्पादकता हे त्यांचे परवलीचे शब्द आहेत. अण्णा शब्दाळ नाहीत. मूक कृतिशील आहेत. त्यांना प्रत्येक रचनात्मक कामाचे ठोस फळ कष्टकरी जनतेच्या पदरात टाकायचे आहे. प्रत्येक लढाईत भांडवली आणि धर्मांध जातीयवादी वृत्तीला दोन पावले का होईना पाठीमागे सारायचे आहे. माणसातल्या स्वार्थी वृत्तीचा बीमोड करायचा आहे. अण्णा हे हाडाचे सेनानी आहेत. त्यांना परिवर्तनाच्या लढाईत अपराजेय प्रभावी पावले टाकणारी लढाऊ कार्यकर्त्यांची फौज उभी करायची आहे. त्यांचा प्रत्येक शब्द काळजाच्या तळातून येतो. त्यांचा शब्द काळ्या दगडावरची रेघ असतो. नागनाथअण्णांच्या बरोबर होणारा प्रत्येक संवाद हवाहवासा असतोच असे नाही. त्यात डाफरणे असते. रागावणे, खडसावणे, इशारा देणे, निर्धार व्यक्त करणे असे असंख्य उग्रमंगल दाहक भावरंग असतात. अण्णांशी संपर्क आणि संबंध प्रस्थापित करणेही असेच अवघड असते. ते भूमिगत असतात. एकटे एकाकी असतात. डोंगरदऱ्यांत निवडक विश्वासू सहकाऱ्यांसह तळात घुसून काम करत असतात. रात्री झोपण्यासाठी चार चार जागा बदलत असतात. प्रसिद्धी पराङ्मुखता त्यांच्या आवडीची आहे. चार-चार महिने ते नागर समाजात येत नाहीत. फोटोसाठी पोज देऊन कधीच उभे राहात नाहीत. पत्रकारांना मुलाखती देत नाहीत. सभा, संमेलने, परिषदा, समारंभांमध्ये मंचावर मिरवत नाहीत, मेजवान्या झोडत नाहीत, कौतुक-स्तुती ऐकून घेत नाहीत, शिष्टाचारही पाळत नाहीत, विनंती धुडकावून लावतात. परिणामांची तमा न बाळगता त्यांना हवे तेच आक्रमक भाषेत मांडतात. त्यांचे वावरणे एका घायाळ, अस्वस्थ सिंहाचे भयसूचक वावरणे असते. पुढच्या क्षणी ते कोणती भूमिका घेतील, कसे वागतील, कोणती कृती करतील हे त्यांच्या दीर्घकाळच्या सहकाऱ्यांनाही कळत नाही. हा माणूस कमालीची धावपळ करतो. अंथरुणावर पडला तर चाळीस मिनिटे झोपतो. दिवस मावळला की यांना उजाडते. जिथे पाऊलवाटाही नाहीत अशा डोंगरात सलग वीस-वीस किलोमीटर चालतो. पाणी दिसेल तिथे आंघोळ करतो, दिवसातून चार-पाच वेळाही. सूर्योदयाला भाजी, भाकरी, कांदा, दही, दूध, ताक असे साधे जेवण करतात. मुंबई, पुणे, दिल्लीलाही जाताना घरची भाजी-भाकरी बांधून नेतात. तीच आवडीने खातात. घटाघटा कासांडीभर पाणी पितात. माणसे तोडायला, दुखवायला अण्णांकडून शिकावे.

तरीही नागनाथअण्णा भारतातले आजचे लोकप्रिय स्वातंत्र्यसेनानी आहेत. दिवसभरात त्यांना सरासरी शंभरावर लोक भेटतात. अण्णांची भेट होईल की नाही, सांगता येत नाही. पण त्यांचा पाहुणचार मात्र घ्यावाच लागतो. मोठा ग्लास भरलेले दूध माणसाचे स्वागत करते. पोटभर साधे सकस घरगुती जेवण घेतल्याशिवाय अण्णांची भेटच होणार नाही. भेटणारा माणूस बोलण्याआधी तो कोणत्या कामासाठी आला असावा ते अण्णा बहुतेक वेळा ओळखतात. काम होणार असेल तर क्षणात उत्तर ''हो!'' होणार नसेल तर पटकन नकार. कोणत्याही कारणासाठी अण्णांनी कोणालाही बोलावले असले तरीही त्याच्या घरातून निघाल्यापासून परत घरी जाईपर्यंतचा प्रवास, भोजन, प्रासंगिक सर्व खर्च अण्णाच करणार. प्रवासात तो माणूस आजारी पडला तर लाखभर

रुपये लागोत, अण्णाच खर्च करणार. मानधन मात्र कोणालाच मिळणार नाही.

नागनाथअण्णांना व्यक्तिगत शत्रू नाहीतच. त्यांचे राजकीय स्पर्धक, विरोधक ऐन निवडणुकीतही खाजगीत असो, जाहीरपणे असो अण्णांबद्दल आदरानेच बोलतात. ''कोणाच्याही वाळल्या पाचोळ्यावर पाय द्यायचा नाही. कोणाच्या सुतळीच्या तोड्याची अपेक्षा ठेवायची नाही!'' हे अण्णांना त्यांचे कष्टकरी शेतकरी असणारे वडील रामचंद्र नायकवडी बापू यांनी बालपणीच शिकवले. ''कोणालाही डरायचे नाही. मरायला तयार असणाऱ्याला मारणारा भेटत नसतो!'' हा निर्भयतेचा मूलमंत्र अण्णांना आई लक्ष्मीबाई नायकवडी यांनी दिला. ''नागनाथ, प्रसंगी जात सोड, पण कष्टकऱ्यांची धरलेली पात कधीच सोडू नकोस!'' असे क्रांतिगुरू क्रांतिसिंह नाना पाटलांनी हृदयावर कोरले. कर्मवीर भाऊराव पाटील अण्णांनी दिवसाढवळ्या तुरुंग फोडून आलेल्या नागनाथअण्णांना जोखीम सोसून आपल्या, रयतेच्या बलदंड बाहूत घेतलं. गुप्तपणे परत वाळव्याच्या क्रांतिभूमीत सुखरूपपणे आणून सोडलं.

साने गुरुजींना मधु लिमयेंसारखाच नागनाथअण्णा आपला धडपडणारा मुलगा वाटायचा. एस.एम. अण्णांना राष्ट्र सेवा दलाचा हा समाजवादी शीलाचा सैनिक वाटायचा. आचार्य जावडेकर अण्णांच्या 'गावराज्य' साप्ताहिकाचे मार्गदर्शक होते. जे.पी. नाईक अण्णांना आपला मानसपुत्र मानायचे. भारताचे पंतप्रधान व्ही.पी. सिंग आजारी पडले की अण्णांना भेटण्याची इच्छा व्यक्त करायचे. इंदिरा गांधी अण्णांच्या आईची पत्र लिहून आस्थेने विचारपूस करायच्या. मान्यवर काशीराम महाराष्ट्रात दहा वर्षे अण्णांसोबत फिरायचे. न्यायमूर्ती पी.बी. सावंत, कोळसेपाटील, बाबुराव बागुल, नारायण सुर्वे, निळूभाऊ फुले, डॉ. आ.ह. साळुंखे, ए.बी. बर्धन, किर्लोस्करचे जनरल मॅनेजर पी.डी. गुणे किती नावे सांगावीत. हे सारे नागनाथअण्णांचे सुहृद आहेत.

१९४४ साल. एप्रिल महिना. धुळे खजिना लुटलेले नागनाथअण्णा रात्री एक वाजता सहकाऱ्यांसह ग.दि. माडगूळकरांच्या रंकाळ्याजवळच्या घरी धडकले. त्या चौघांनाही दिसताक्षणी गोळ्या घालण्याचा आदेश. जिवंत किंवा मृत पकडून देणाऱ्यास हजारोंची बक्षिसे. गदिमांच्या सौभाग्यवतींनी दोन हंडे पाणी तापवून प्रथम त्यांना आंघोळ घातली. गदिमांनी एक न्हावी उठवून आणला. त्याने चौघांच्या पायात मोडलेले काटे काढले. गदिमा भर रात्री पळापळ करून जेवणाच्या सामानाची जुळवाजुळव करताहेत. पुरणपोळीचा बेत. तळमजल्यावर राहणाऱ्या दीनानाथ मंगेशकरांची मोठी मुलगी पोळ्या लाटायला मदत करत असलेली. गदिमा म्हणाले, ''अगं लता, पोळ्या कसल्या लाटतेस? हे पाहुणे फार मोठे आहेत. त्यांच्यासाठी गाणं म्हण!'' पाहुणे थकलेले, घोरायला लागलेले. गदिमांनी त्यांना जागे केले. लताने सुंदर, भावभरे, हृदयस्पर्शी गीत म्हटले. तृप्त पाहुणे म्हणाले, ''निघतो, कोंबडा आरवायच्या आत बाहेर पडायला हवे. जोतिबाचा डोंगर गाठायचाय!'' ही आठवण सांगताना आजही अण्णा पाझरतात, निरागसपणे.

नागनाथअण्णांनी हुतात्मा स्मारक समिती संघटित केली. किसान शिक्षण संस्था उभारली. विद्यालये, वसतिगृहे, महाविद्यालये उभारली. किसान लिफ्टस् उभारल्या, रस्ते, बंधारा उभारला. लाखाच्या जवळपास झाडे लावली. हु. किसन अहिर सहकारी साखर कारखाना उभारला. कारखान्यात असंख्य राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय उच्चांक तयार केले. राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू तयार केले. १९४० साली डोंगरात चाळीस प्राथमिक शाळा सुरू केल्या.

नागनाथअण्णांनी काय काय केले? कसे केले? यापेक्षा ज्या भावनेने, ज्या विचाराने, ज्या शास्त्रशुद्ध वैज्ञानिक, तर्कशुद्ध कार्यपद्धतीने, दीर्घकाळच्या परिश्रमाने, निष्ठेने केले ती पद्धत अतिशय महत्त्वाची आहे. ही विचार आणि कार्यपद्धती शोधण्यात, विकसित करण्यात आणि व्यवहारात सिद्ध करण्यात खरे मोठेपण सामावले आहे. नागनाथअण्णांचे एकमेवाद्वितीयपण या विचार निर्धारात आहे. याच विचाराला पुढे लोकांनी, 'हुतात्मा पॅटर्न' असे नाव दिले. हुतात्मा कारखान्याच्या अपूर्व यशानंतर हा शब्द पुढे आला. १९४० साली कामेरी ता. वाळवा येथे पहिली विद्यार्थी परिषद संघटित करणाऱ्या एका तरुण विद्यार्थ्याच्या मनात या विचाराचे बीज प्रथम पडले. सत्तर वर्षांच्या अथक साधनेचे फळ आज आपण पाहत आहोत. या साधनेतच एक प्रखर क्रांतिकारी देशभक्त घडला. उत्पादक संस्थांचा उद्गाता सापडला. स्वतंत्र भारताचा पद्मभूषण उमलला. नवमहाराष्ट्राचा एक शिल्पकार साकारला. समतेचा, शोषणमुक्तीचा, परिवर्तनाचा सैनिक क्रियाशील बनला. तत्त्वज्ञ शिस्तबद्धपणे सखोल तत्त्वज्ञानाची मांडणी करतात. काही माणसांच्या कृतीतून तत्त्वज्ञान व्यवहारात उभे राहते. क्रांतिवीर नागनाथअण्णा असे कृतीतून तत्त्वज्ञान उभे करणाऱ्या दुर्मिळ माणसांपैकी एक आहेत, असे मला वाटते. जसजसा काळ जाईल तसतसा अण्णांच्या तात्त्विक कृतींचा आशयप्रकाश तेजाळ बनल्याशिवाय राहणार नाही.

**– प्रा. डॉ. बाबुराव गुरव**
प्रबोधन निवास,
सोमवार पेठ, तासगाव, जि. सांगली.
Mob. 9766396990